- प्रकरण सातवे -

# उ प सं हा र

पृठ क्रमांक 81 ते 85

## प्रकरण सातवे

## उ प सं हा र

शंकरराव खरातांची कथा ही स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आहे. समाजातील दलित, पीडितांची, गावकुसाबाहेरील माणसांची दु:खे आपल्या कथांच्याद्वारे साहित्याच्या वेशीवर टांगण्याचे काम शंकरराव खरातांनी केले. खेडयापाडयातील वेगवेगळया मागासलेल्या जाती-जमातीतील अहोरात्र राबणा-या दरिद्री लोकांची चित्रे, त्यांच्या जीवघेण्या दु:खासह आणि भेसूर दारिद्रयासह खरातांनी चित्रित केली. शंकररावांनी आपल्या समाजातल्या माणसांचे दु:ख पांढरपेशा जगाच्या कानावर घालावे अशा हेतूनेच त्यांनी आपल्या कथा लिहिल्या आहेत. यावरून त्यांचे लेखन हेतूनिष्ठ आहे. गोरगरिबांची दु:खे चित्रित करूनही खरातांनी आपल्या कथांना प्रचारकी स्वरूप कुठे येऊ दिले नाही हे त्यांचे वैशिष्ट्य होय.

वामन होवाळ यांचे कथालेखन हे नवोदित दलित कथेच्या अभिव्यक्तीच्या अंगाने झालेले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आहे. या कालखंडात मराठी कथेत मोठया प्रमाणावर परिवर्तन झाल्याचे दिसते. दुस-या महायुद्धातून जी नवकथा उर्फ नवोदित कथा निर्माण झाली तिने आशय व अभिव्यक्ती यांच्या अंगानी मराठी कथा समृद्ध केली. यातून जीवनातील अर्थशून्यता, दुर्बोधता, यांत्रिकता कथेत आली. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण कथा हा प्रमुख कथाप्रवाह होता. पूर्वीची रोमँटिक अद्‌भूत, स्वप्नाळू व रंजनाच्या पातळीवरील ग्रामीण कथा व्यंकटेश माडगूळकरांनी रंजनवादी बनविली. दलित कथेने ग्रामीण कथेपेक्षा वेगळया प्रेरणेतून उपेक्षितांचे जीवन रेखाटले आणि मराठी कथा समृद्ध केली. शंकरराव खरातांची कथा रूपाच्या दृष्टीने व्यंकटेश माडगूळकर व शंकर पाटील यांच्या वळणाची ठरते. अण्णाभाऊ साठे यांची कथा सुधारणावादी भूमिकेतून दलित जीवनाचे चित्रण करता करता रोमँटीक, अद्‌भूत व आध्यात्मिक स्वरूपाची झालेली दिसून येते. बंधुमाधव प्रेमकथेचा विषय वर्तुळातून बाहेर पडले व त्यांनी दलित जीवनावर

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

कथा लिहायला सुरवात केलेली दिसते. बाबुराव बागूलांनी दलित साहित्यविषयक मांडलेली भूमिका व्यापक, विशाल व मानवताधिष्ठित आहे. त्यांची कथा ही उत्तम दर्जाची दलित कथा आहे. यात डॉ. आंबेडकर, मार्क्स, महात्मा गांधी अशा विविध प्रेरणातून कथालेखन केलेले आढळते. या कथेतून दलितांच्या जीवनाचे अनुभव व्यक्त झाले आहेत. या कथेने पारंपारिक धर्मव्यवस्था व जीवन पद्धती या विरूद्ध विद्रोह करून मानवतावादी मूल्यांचा स्वीकार केला आहे.

"सांगावा" मध्ये येसकर, तराळ, वैदू, बेरड, मांग इ. जाती जमातीतल्या भिका-यांची आणि तमासगिरांच्या जीवनातील दु:खे खरातांनी चित्रित केलेली आहेत. त्यांच्यावर होणारे अन्याय, भरपूर काम करून घेऊन त्यांना मोबदला न देण्यासाठी होणारी पिळवणूक त्यांच्याबद्दल वरच्या जातीतील गावक-यांना वाटणारा द्वेष व तिरस्कार अशा अनेक प्रश्नाचे चित्रण ते परिणामकारक करून त्यांच्याद्वारे त्या वर्गाचे दु:ख चितारतात.

खरातांच्या कथा प्रामुख्याने व्यक्तिप्रधान आहेत. किंबहुना त्यांना विशिष्ठ दु:खाने पोळलेली व्यक्तीच त्यांनी आपल्यापुढे उभी करायची असते म्हणून खरातांच्या कथा हया ख-या अर्थाने व्यक्तिचित्रेच आहेत. मात्र ती दु:खे व्यक्तीची असण्यापेक्षा मानवीसमूहाची आहेत. त्यात स्वत:च्या दु:खाचा पदर नसतो असे नाही पण त्यांची दु:खे निर्माण झाली आहेत ती त्यांनी एका विशिष्ठ जाती जमातीत जन्म घेतल्यामुळे त्यांची दु:खे बरीचशी सारखीच आहेत. त्यामुळे या व्यक्तिचित्रांना व्यक्तिविशिष्टता लाभलेली नाही. एका मानवी समूहाची दु:खे सांगणारा प्रतिनिधी म्हणून ती आपल्यापुढे येतात. व्यक्तीची दु:ख व्यक्त करण्यात खरातांनी ज्या प्रसंगाचा आधार घेतला आहे ते मात्र प्रत्ययकारीपणे चित्रित केले आहेत

वातावरण निर्मितीचे खरातांचे कौशल्य उल्लेखनीय आहे. खरातांची सूक्ष्म निरीक्षण शक्ती, बारीक तपशीलासह वातावरणात उभे करण्याचे कौशल्य हे त्यांच्या कथांच्या यशाचे खरे रहस्य म्हणता येईल. निवेदन शैली परिणामकारक आहे तिला खरातांच्या भाषेची जोड मिळाली आहे. अर्थपूर्ण भेदक संवादातून खरात परिणामकारकता साधतात. आवश्यक तिथं ग्रामीण बोलीचा वापर, काही ठिकाणी तिच्यावरील निव्वळ शब्दांचा उपयोग केल्याने खरातांचे निवेदन अर्थघन बनते.

त्यामुळेच त्यांच्या कथेत अश्लीलता नाही. कामुक वर्णनाची खैरात नाही, दारू शृंगाराची मेजवानी

नाही. तोंडाला पाणी सुटावे असे सौष्ठवपूर्ण शरीरवर्णने नाहीत. स्त्री-पुरूषांचे उघडे-नागडे विकृत संबंध नाहीत. तात्पर्य त्यांचे लेखन विकृतीसाठी नाही ते प्रकृतीसाठी आणि त्यातुन व्यक्त करावयाच्या संस्कृतीसाठी आहे. जवळ जवळ चार दशके एकनिष्ठेने कथा लिहिणारे व दलितांच्या दु:खाकडे लक्ष वेधणारे पहिल्या पिढीतले प्रमुख लेखक म्हणून त्यांचे स्थान मानाचे आहे.

वामन होवाळांची कथा ही ग्रामीण कथा आहे. ग्रामव्यवस्थेतील कटू अनुभव ते विनोदाच्या सहाय्याने मांडतात काही वेळा मुंबईसारख्या शहरातील झोपडपट्टीतील दलित जीवनाचे चित्रणाही विनोदाच्या सहाय्याने रेखाटतात. त्यांच्या कथेतील व्यक्तिरेखा या ठराविक साचाच्या नसुन विविध वृत्ती-प्रवृत्तीच्या आहेत. ही पात्रे बेरकी, इरसाल, टगी, छिनाल, टोणगी, कणखर, दुबळी, उत्साही, निराश, इमानी, बदमाश, भोळी, धूर्त अशी भिन्न भिन्न प्रवृत्तीची माणसे त्यांच्या कथात आढळतात. या माणसांबरोबरच परंपरावादी आणि परिवर्तन वादी माणसेही होवाळांनी चितारली आहेत. या व्यक्तिंचे स्वभाव हे तेथील परिसराचे, धार्मिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्थितीतून घडलेले आहेत. ही माणसं कधी त्या प्राप्त परिस्थितीत शरण जातात तर कधी संघर्षास उभी राहतात. या संघर्षामध्ये ती यशस्वी ठरतात तर कधी अपयशीही ठरतात. कथेचा घटक म्हणून जो संघर्ष त्यांच्या कथांमध्ये येतो तो त्याला कोणत्याही प्रकारचा भडकपणा नसतो, आक्रस्ताळेपणा, उरबडवेपणा याला त्यांच्या कथेत थारा नसतो. त्यांनी वेगवेगळया वातावरणात व्यक्तिमनाच्या वृत्तिप्रवृत्तीचे सूक्ष्म दर्शन त्यांच्या कथेमधून घडते हेच त्यांच्या व्यक्तिचित्रणाचे वैशिष्टय होय. संयमित पण समृद्ध अनुभवाच्या जोडीने माणसांचे जीवंत वास्तव चित्र रसिक वाचकांसमोर ठेवले आहे. व्यक्तिच्या वागण्या-बोलण्यातून आणि विचार करण्याच्या पद्धतीतून त्यांचे स्वभाव उलगडत जातात. मात्र हया व्यक्ति कोणत्याही प्रकारचे भाष्य करताना दिसत नाही का कुणाला उपदेश, तत्वज्ञान सांगण्याच्या भानगडीत पडत नाहीत. स्वत:च्या परीने स्वभावधर्माने जीवन कंठत असतात. वामन होवाळही कोणत्याही प्रकारचे भाष्य न करता संयमी वृत्तीने चित्रण करताना दिसतात. त्यात परस्पर विरोधी व्यक्तिचित्रणेही सापडतील. होवाळांनी विनोदी कथेचे क्षेत्र अधिक विकसित केले. स्वत:तील विसंगती, हास्यास्पदता, स्वत: स्वत:तील व्यंग, दोष या बाबीकडे विनोदी दृष्टीने पाहण्याचे कसब फक्त होवाळांनीच ओळखले. मोठया माशाने लहान माशाला गडप करायचे, हुशारांनी दुबळयांना ओरबाडायचे, शिकलेल्यांनी अशिक्षितांवर डाव

डाव टाकायचे हे सर्व प्रकार त्यांच्या ओळखीचे आहेत. पण ते हे प्रकार व्यंगात्मक विनोदातून दाखवितात.

वामन होवाळांच्या कथेचा स्थायीभाव विशिष्ठ जाती हा नसून विशिष्ठ प्रवृत्ती हा आहे. त्याहून त्यांच्या कथेचा नायक व्यक्ती नसून प्रवृत्ती आहेत हे लक्षात घेण्यासारखे आहे. वामन होवाळांच्या कथेमधून विविध व्यक्तिस्वभावांच्या विविध रूपाचे दर्शन होते.

शंकरराव खरात व वामन होवाळ यांच्या कथालेखनातील साम्य व भेदामध्ये दोहोंच्याही कथेतला परिसर हा सांगली जिल्हयातील आहे. खरात व होवाळांच्या कथेच्या प्रेरणा हया आंबेडकरी आहेत. व्यक्तिचित्रणामध्ये दोन्हीही कथाकार सरस आहेत. कथासंग्रहाची शीर्षक ही यथोचित नि सार्थ अशीच आहेत. प्रसंग, घटना, संवाद यामध्ये प्रत्येकाची ढब नि डूब वेगळी आहे. गाव सोडतानाच खेडं खरात होवाळांच्या मनात कायमचं घर करून आहे. खरातांची माणसे ही अंधश्रद्धेत, दबावाखाली अडकून पडलेली तर होवाळांची कथेतली माणसे ही अंधश्रद्धेचं जोखड फेकून देणारी आणि परिवर्तनवादी आहेत. वामन होवाळांच्या स्त्रीव्यक्तिरेखापेक्षा खरातांनी स्त्रीव्यक्तिरेखा सरस चितारल्या आहेत.

शंकरराव खरात व वामन होवाळ महाराष्ट्रातील सांगली भागातील बोली आपल्या कथेतील संवादासाठी वापरतात. निवेदनातही त्या भाषेचा ढंग आणतात. आशयाच्या गरजेनुसार म्हणी व वाक्प्रचारांचा ते यथायोग्य उपयोग करतात.

वरील विवेचनावरून शंकरराव खरात व वामन होवाळ यांच्या कथालेखनाचा तुलनात्मक अभ्यास मी केलेला आहे. पण हा अभ्यास करताना कथेच्या पूर्वपीठीकेपासून नवोदित कथाकार वामन होवाळांच्या पर्यंत कालखंडातील दलित कथाकारांचा अभ्यास थोडक्यात केला आहे. शंकरराव खरातांचे वाङ्‌मयीन विशेष, व्यक्तिमत्व, सांगावातील व्यक्तिचित्रणे वामन होवाळांचे वाङ्‌मयीन विशेष, व्यक्तिभाव, येळकोट मधील व्यक्तिचित्रणे यांचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये अभ्यासक म्हणून मला जे काही भावले ते येथे नोंदवले आहे. तसेच शंकरराव खरात व वामन होवाळ यांच्या कथालेखानातील साम्य व भेद सांगितला आहे

तो सर्वमान्य होईलच असे नाही. मात्र या ठिकाणी एका निखळ संशोधकाच्या भूमिकेतून "शंकराव खरात व वामन होवाळ यांच्या कथालेखनाचा तुलनात्मक अभ्यास" (सांगावा व येळकोट संदर्भात) करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

- - -